ग्रामपंचायतीमधील महिला लोकप्रतिनिधींचा राजकीय सहभाग :
विशेष संदर्भ बीड जिल्हा (**2010-2020)**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्यविज्ञान विदयाशाखेअंतर्गत राज्यशास्त्र विषयातील
विदयावाचस्पती (पीएच. डी.)पदवीसाठी करण्यात येत असलेला
संशोधन आराखडा

संशोधक

युवराज गोरख महाडीक

मो.8459626793yuvrajmahadik45@gmail.com

मार्गदर्शक

प्रा. डॉ.रजनी बोरोळे

(एम. ए. पीएच. डी.)

मो.9420211093/drrajniborole@gmail.com

विभागप्रमुख, राज्यशास्त्रविभाग

कर्मयोगी तुळशीराम पवार महाविद्यालय, हाडोलती ता. अहमदपूर, जि. लातूर

संशोधन केंद्र

पीपल्स महाविद्यालय, राज्यशास्त्रविभाग, नांदेड

1.1 प्रस्तावना :-

आधुनिक राज्याचे स्वरुप, भूप्रदेश आणि लोकसंख्या या दृष्टीने व्यापक आहे. या व्यापकतेमुळे संपूर्ण देशाचा कारभार एकाठिकाणावरुन चालविणे शक्य नाही. हा कारभार व्यवस्थितपणे चालविता यावा यासाठीच लोकशाही शासन पध्दतीचा विकास करण्यात आलेला आहे. या लोकशाही शासन पध्दतीमध्ये स्थानिक स्वराज्य संस्था अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावत असतात.

या संस्थाद्वारेच जनतेत राजकीय जागृत निर्माण होऊन लोकशाहीला पोषक असे वातावरण तयार होत असते. या संस्था लोकशाहीचा व शासनाचा आधार आहे अशा संस्थांद्वारे शासनाला जनतेचे विविध प्रश्न सोडविता येतात. पण या स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभार लोकशाही शासन प्रणालीनुसार चालविण्यासाठी लोक संख्येच्या प्रमाणात महिलांना प्रतिनिधित्व न देता अल्प प्रमाणात प्रतिनिधित्व होते.

भारत स्वतंत्र झाल्यानंतर संविधानाला घटनात्मक कायदेशीर दर्जा प्राप्त झाला व येथील सार्वभौम जनतेच्या विकासाच्या वाटा निश्चित झाल्या. संविधानाच्या अंमलबजावणीमुळे महिलांना राजकीय सहभागाच्या वाटा खुल्या करण्यात आल्या. त्यामुळे महिलांचा भारतीय राजकारणात मोठ्या प्रमाणात प्रभाव पडला.

भारतामध्ये लोकशाही शासनप्रणाली असून राजकीय पक्षांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. या राजकीय पक्षांच्या मार्फतच निवडून आलेल्या लोक प्रतिनिधींमार्फत राज्यकारभार चालविला जातो यामधील प्रत्यक्ष सत्तेतील पदे महिलांनी

भूषविलेले आहेत. महाराष्ट्र सरकारने वसंतराव नाईक समितीच्या शिफारशीनुसार पंचायतराज व्यवस्था सुरु केली. या श्री वसंतराव नाईक समितीच्या शिफारशीनुसार महाराष्ट्र सरकारने 1 एप्रिल 1961 रोजी महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती कायदा संमत केला. पण हा कायदा अस्तित्वात येण्या अगोदर महाराष्ट्रामध्ये ग्रामीण स्तरावर ग्रामपंचायत स्थापन करण्याची तरतूद सन 1958 च्या मुंबई ग्रामपंचायत अधिनियमाद्वारे करण्यात आली होती.

महाराष्ट्रातील संपुर्ण ग्रामपंचायतींचा कारभार सन 1958 च्या याच कायद्यानुसार चालविला जातो. सन 1 मे 1962 रोजी महाराष्ट्रात पंचायतराज व्यवस्था स्वीकारण्यात आली व यामध्ये ग्रामपंचायतीचा समावेश करण्यात आला. प्रस्तुत संशोधनाचा मुख्य गाभा हा स्थानिक स्वराज्य संस्थेतील महिलांचा राजकीय सहभाग वाटचाल, सक्षमीकरण राजकीय जागृती, व राजकीय दृष्टीक्षेप घेऊन विषयाची मांडणी करणे प्रस्तावित आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभार लोकशाही मार्गाने चालवत असताना त्यात मात्र महिलांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणामध्ये प्रतिनिधित्व दिल जात नव्हत यावर उपाय म्हणून तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांनी महिला व अल्पसंख्यांक यांना राजकीय सत्तेत सहभागी करुन घेण्यासाठी 1985 मध्ये पी.व्ही.के. राव यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली. यानंतर या समितीच्या शिफारशीनुसार व 73 व्या घटना दुरुस्तीनुसार 24 एप्रिल 1993 रोजी पी.व्ही. नरसिंहराव सरकारने शिफारशी अंमलात आणल्या.

या घटनादुरुस्तीने स्थानिक स्वराज्य संस्थेच्या इतिहासात एक अमुलाग्र बदल घडून आला आणि पंचायत राज्यमध्ये

स्वातंत्र्याची एक नवी पहाट झाली. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना 33 % जागा केवळ राखीव न ठेवता सर्व पदाधिकारी सदस्य यामध्ये ही आरक्षण ठेवण्यात आले व त्याची कडक अंमलबजावणी करण्यात आली. त्यानंतर 14 एप्रिल 2011 रोजी महिलांना पंचायत राज मध्ये 50 % जागा सर्व पदाधिकारी, सदस्य यामध्ये आरक्षण निश्चित करण्यात आले.

स्थानिक स्वराज्य संस्थेत जरी महिलांना मोठ्या प्रमाणात प्रतिनिधित्व उपलब्ध करुन देण्यात आले असले तरी संसदेमध्ये त्याचबरोबर विधानभवनामध्ये अजुन तरी महिलांना पुरेसा प्रमाणात प्रतिनिधित्व मिळत नाही ही आपल्या देशाची शोकांतिका आहे.

प्रस्तुत संशोधनाच्या सहाय्याने स्थानिक स्वराज्य संस्थेत प्रत्यक्ष राजकीय प्रक्रियेतील महिलांचा सहभाग, पाहण्याचे नियोजित आहे.

1.2 संशोधन विषयाचे महत्त्व :-

प्रस्तुत संशोधनासाठी मराठवाडयातील एक प्रमुख असलेला पण आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास असलेल्या बीड जिल्ह्याची निवड करण्यात आलेली आहे. या जिल्ह्यापुरतेच संशोधकाचं संशोधन क्षेत्र मर्यादित आहे.

या जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेतील ग्रामपंचायत हा घटक संशोधनासाठी निवडला असून यामध्ये महिलांचा प्रत्यक्ष राजकीय निर्णय प्रक्रियेतील सहभाग अभ्यासवयाचा आहे.

बीड जिल्ह्यामध्ये एकुण 11 तालुके आहेत. जणगणना 2011 नुसार एकुण 1020 ग्रामपंचायती पैकी 832 स्वतंत्र व 188 गट ग्रामपंचायती आहेत. बीड जिल्ह्यामध्ये 2011 च्या जणगणने प्रमाणे हजार पुरुषामागे 916 स्त्रिया असे प्रमाण आहे. जिल्ह्यात

नागरी व ग्रामीण भागाचा विचार करता नागरी भागातील हे प्रमाण 933 स्त्रिया असे आहे. तर ग्रामीण भागात हेच प्रमाण 912 स्त्रिया असे आहे.

<u>संशोधन विषयातील महत्त्वाचे मुद्दे :-</u>

1. लोकशाही विकेंद्रीकरणातील पाया असणाऱ्या ग्रामपंचायत मधील महिलांच्या राजकीय सहभागाचा अभ्यास करणे.
2. पंचायत राज व्यवस्थेत महिलांना मिळालेल्या अधिकाराचा त्या कसा वापर करतात ते पाहणे.
3. महिला असल्या कारणाने त्या कोणत्या समस्या प्राधान्य क्रमाने सोडवितात हे अभ्यासणे.
4. प्रत्यक्ष राजकीय प्रक्रियेमध्ये सहभागी होऊन निर्णय घेताना त्यांना कोणत्या समस्यांना सामोरे जावे लागते हे अभ्यासणे.

1.3 संशोधन विषय :-

राजकीय सहभाग हा लोकशाही व्यवस्थेचा पाया आहे. भारताने प्रातिनिधिक लोकशाही स्वीकारुन संघराज्य व्यवस्थेअतर्गत केंद्र व राज्यामध्ये सत्तेची विभागणी केली. ग्रामीण जनतेला सत्तेत व विकास प्रक्रियेत सामावून घेण्यासाठी सत्तेचे विकेंद्रीकरण करण्यात आले. स्थानिक स्वराज्य संस्थांची स्थापना करुन ग्रामीण जनतेला सत्तेन वाटा दिला. या संस्थांच्या माध्यमातून नवीन नेतृत्व उदयाला आले. आरक्षणाच्या धोरणामुळे सत्तेपासून वंचित असलेला वर्ग निर्णय प्रक्रियेत महत्वाची भूमिका बजावू लागला.

यातूनच “महिला सरपंच व सदस्यांचा राजकीय सहभाग : विशेष संदर्भ बीड जिल्हा” हा संशोधन विषय निवडलेला आहे. समाजात महिलांना पुरुषांच्या बरोबरीने समान राजकीय संधी

महिलांची राजकीय सहभागात संख्यात्मक व गुणात्मक वाढ राजकीय सहभागातील अडचणी, याची उकल होण्यासाठी हा विषय निवडला आहे.

1.4 संशोधन प्रश्न :-

1. कायदेशीर दृष्ट्या महिलांचा राजकीय सहभाग वाढला आहे. त्यांना अधिकार पदेही मिळालेली आहेत. परंतु प्रत्यक्षात महिला राजकीय प्रवाहात सामिल झाल्या आहेत का ? या संशोधनाचा मुख्य प्रश्न आहे.
2. राजकीय निर्णय प्रक्रियामध्ये सहभागी होण्याच्या संधीचा फायदा ग्रामीण भागातील स्त्रियांना होत आहे का ? हे पाहणे या संशोधनाचे प्रमुख कार्य आहे.
3. बीड जिल्ह्यातील ग्रामपंचायत स्तरीय महिला आरक्षण नेतृत्व सबलीकरण, निर्णक्षमता या सर्व समस्यांना एकत्रित संशोधनात्मक अभ्यास करणे ही या संशोधन विषयाची निवड करण्याची प्रमुख कारण आहे.

1.5 सैध्दांतिक संकल्पना :-

महिला सरपंच व सदस्यांचा राजकीय सहभाग या संशोधन विषयाचा अभ्यास करताना आपल्याला राज्यशास्त्रातील राजकीय सामाजिक रणामधील राजकीय सहभाग या संकल्पनेचा आढावा संशोधनासाठी घेणे अत्यंत आवश्यक आहे.

राजकीय सहभाग याचा अर्थ नागरिकांचा राजकारणात सहभाग होय. लोकशाहीत लोक जर राजकारणात मोठ्या प्रमाणात सहभागीं झाले तर राजकीय व्यवस्थेबरोबर राजकीय सत्तेला मान्यता मिळते. राजकीय सहभाग हा फक्त राजकीय निर्णय प्रक्रियेत सहभागी होण्यापुरता मर्यादित नसतो. तर तो ज्या ज्या वर्तणुक प्रकाराने शासकीय निर्णय प्रक्रियेत नागरिक प्रत्यक्ष किंवा

अप्रत्यक्षरित्या सहभागी होतात. ती प्रत्येक वर्तणुक प्रकार म्हणजे राजकीय सहभाग होय.

<u>व्याख्या :-</u>

प्रा. आल्मंड व पॉवेल :-

" राजकीय व्यवस्थेतील निर्णय प्रक्रियेत असलेला लोकांचा सहभाग म्हणजे राजकीय सहभाग होय."

डेव्हिड ईस्टन :-

"विशिष्ट प्रदेशात राहणारा समूह जो सार्वजनिक स्वरुपाचे निर्णय घेतो व त्यात लोकांनी घेतलेल्या सहभाग हा राजकीय सहभाग असतो"

रश व अल थॉफ :-

या अभ्यासकाच्या मते "व्यक्तीद्वारे राजकीय व्यवस्थेत विभिन्न स्तरावर भाग घेण्याच्या क्रियेला राजकीय सहभाग म्हणतात"

राजकीय सहभागाबाबत अशा वेगवेगळया अभ्यासकांनी वेगवेगळी मते मांडली असली तरी त्यातून थोड्या फार फरकाने एकत्र आशय व्यक्त होतो. राजकीय व्यवस्थेच्या निर्णय प्रक्रियेत जेव्हा एखादी व्यक्ती धोरणात्मक हेतू ठेवून भाग घेते. तेव्हा त्याचा संबंध सार्वजनिक जीवनाशी येतो त्याला राजकीय सहभाग म्हटले जाते.

प्रस्तुत संशोधनामध्ये पंचायत राज संस्थेतील महिलांच्या गुणात्मक व संख्यात्मक राजकीय सहभागाची चाचपणी करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

1.6 संशोधनाची उद्दिष्टे :-

1. संशोधनाच्या अभ्यासासाठी पुढील उद्दिष्टे ठेवण्यात आली आहेत.

2. ग्रामपंचायतीमधील महिला लोक प्रतिनिधिंचा सामाजिक आर्थिक व राजकीय स्तर अभ्यासणे.
3. महिला सरपंच व सदस्यांचा राजकीय निर्णय प्रक्रियेतील सहभागाचा अभ्यास करणे
4. राजकीय प्रक्रियेमध्ये सहभागी होत असताना महिला सरपंच आणि महिला सदस्य यांना कोणत्या प्रकारच्या
5. अडचणी येतात याचा अभ्यास करणे.
6. महिला सरपंच आणि महिला सदस्य यांच्या राजकीय सहभागाच्या गुणात्मक दर्जाचा अभ्यास करणे.
7. महिला सरपंच व सदस्य कोणत्या विकास कामाला प्राधान्य देतात याचा संशोधनाच्या माध्यमातुन अभ्यास करणे.

1.7 गृहीतके :-

प्रस्तुत संशोधनाची गृहीतके खालील प्रमाणे निश्चित केली आहेत.

1. आरक्षणामुळे ग्रामीण भागातील महिलांच्या नेतृत्वाचा विकास झालेला आहे.
2. शैक्षणिक जनजागृतीमुळे महिला सरपंच व सदस्यांचा सामाजिक व राजकीय सहभाग वाढला आहे.
3. आरक्षणामुळे ग्रामपंचायतीच्या निर्णय प्रक्रियेत महिला सरपंच व सदस्य यांचा सहभाग वाढल्यामुळे ग्रामीण भागातील प्रश्न सुटण्यास मदत झाली आहे.
4. ग्रामपंचायतीतील आरक्षित पदावरील सरपंच महिला व सदस्यांच्या कार्यप्रक्रियेत पती, नातेवाईक अथवा इतर पुरुषी नेतृत्वाचा हस्तक्षेप होताना दिसतो.

1.8 संशोधन पध्दती :-

प्रस्तुत संशोधन विषयाच्या समस्या सोडविण्यासाठी संख्यात्मक व गुणात्मक सामाजिक शास्त्रातील संशोधन पध्दती

निश्चित केली आहे. संशोधन तथ्य संकल्पना आणि सामाजिक शास्त्रानुसार प्रमुख्याने सहेतुक कार्ड व अनियमित अंकन (जिल्हा, तालुका व ग्रामपंचायत) नमुना निवड संशोधनात्मक प्रचलीत पध्दतीचा वापर केला जाईल. प्राथमिक व दुय्यम माहिती संकलन तंत्राचा वापर करण्यात येईल. ग्रामपंचायतीतील महिला सरपंच व महिला सदस्य यांच्या मुलाखतींसाठी रचनात्मक मुलाखती घेण्यात येतील.

1. <u>प्राथमिक माहिती तंत्र</u> :-

प्रस्तुत संशोधनासाठी निश्चित केलेल्या गृहितकांची पडताळणी व उकल होण्यासाठी आवश्यक तथ्य संकलनासाठी प्राथमिक माहिती तंत्राचा वापर करण्यात येणार आहे. त्यासाठी निवडक ग्रामपंचायतीमधील महिला सरपंच व सदस्य यांच्यासाठी प्रश्नावली , मुलाखत, अनुसूची, अनौपचारिक मुलाखतदार, निरिक्षण या तंत्राचा वापर करण्यात येईल.

2. दुय्यम माहिती तंत्र :-

प्रस्तुत संशोधनासाठी दुय्यम माहिती तंत्रत्र अंतर्गत ग्रंथालयामधील विविध संदर्भ ग्रंथ, मासिके, शासकीय अहवाल विविध महिला संघटनांकडून माहिती महाराष्ट्रातील वेगवेगळया विद्यापीठातील प्रस्तुत विषयाशी निगडीत शोध प्रबंध इंटरनेटवरील माहिती, दुरध्वनीद्वारे संकलित केलेली माहिती इत्यादी दुय्यम माहिती स्त्रोताचा संशोधनासाठी वापर करण्यात येणार आहे

1.9 नमुना निवड :-

बीड जिल्ह्यातील एकुण 11 तालुक्यापैकी 5 तालुक्यांची कार्ड नमुना निवड पध्दतीने निवड करण्यात येईल. या 5 तालुक्यामध्ये 518 ग्रामपंचायती असून 50 % महिला

आरक्षणानुसार 259 ग्रामपंचायतींची सरपंच पदे महिलांसाठी आरक्षित आहेत. त्यापैकी 20 % ग्रामपंचायतीची अनियमित अंकन पध्दतीने नमुना निवड करण्यात येईल. निवडलेल्या सर्व ग्रामपंचायतीतील महिला लोक प्रतिनिधी (सरपंच व सदस्य) यांच्या प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे माहितीचे संकलन करण्यात येईल.

1.10 पुर्वसंशोधनाचा आढावा :-

संशोधन कार्य पुर्ण करण्यासाठी विविध संशोधकाच्या संशोधन अभ्यासाद्ववारे विविध संशोधन माहितीचा आवश्यक संदर्भ साहित्याचा आढावा घेण्यात येईल.

1. डॉ. रोहिणी गव्हाणकर :-

यांनी मराठा स्त्री शक्तीचे राजकारणी रुप पुस्तकामध्ये महाराष्ट्रातील मराठा महिलांच्या विविध क्षेत्रातील महिलांचा तसेच शहरी व ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये निवडून आलेल्या महिला प्रतिनिधींचा अभ्यास करुन असे दाखवून दिले की, पंचायतराज संस्थांमध्ये त्या काळात निवडून आलेल्या महिला प्रतिनिधीमध्ये सामाजिक व राजकीय दृष्ट्या जागृत होण्याचा महिलांमधील वेग फारच कमी आहे.

2. श्वाती देहाडराम , अनघा तांबे (संपादित) :-

लिंगभाव अभ्यास पाठ्यापुस्तक मालिका पदवीपुर्व अभ्यासक्रमाचे स्त्रिया कायदा आणि राजकारण यावर संपादित पुस्तक आहे. यामध्ये संविधानात्मक तरतुदी, लिंगभाव, मानवी हक्क, स्त्रियाचा राजकीय सहभाग आणि स्त्रियांसाठी आरक्षण विषय यामध्ये अभ्यासण्यात आलेला आहे.

3. विजय चोरमारे :-

“स्त्रि सत्तेची पहाट” या आपल्या ग्रंथात विजय चोरमारे यांनी जिल्हा परिषद, पंचायत समिती ग्रामपंचायत स्तरावर आता

स्त्रिया स्थिरावल्या आहेत व त्या खंबीरपणे काम करीत आहेत. त्यांना इथपर्यंतचा प्रवास मात्र अडनर मार्गाने करावा लागला, हे त्यांनी संशोधन प्रकल्पातुन निष्कर्ष दिले आहेत.

4. <u>बळीराम कटारे</u> **:- (2010)**

" यांनी आपल्या ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थेतील महिला पदाधिकाऱ्यांचे स्थान जालना जिल्ह्यातील महिला सरपंचाच्या कार्याचा चिकित्सक अभ्यास (1994-2004) या प्रबंधातून त्यांनी काही बाबी समोर आणल्या आहेत. त्यांनी स्पष्ट केले आहे की महिला सरपंचांना त्यांचे कार्य पार पाडत असतांना विविध शासकीय अधिकाऱ्यांनी सहकार्य केले पाहिजे. त्यांच्या कुटुंबाचा भार हलका केला पाहिजे अशा स्वरुपाच्या शिफारशी करण्यात आलेल्या आहेत.

5. <u>पुंडलिक कोलते **(2006)**</u> **:-**

यांनी "औरंगाबाद जिल्हयातील पंचायत राज व्यवस्थेत महिलांचा सहभाग (1991-2001)" या विषयावर त्यांनी अर्थशास्त्र विभागातर्गत संशोधन कार्य पुर्ण केले आहे. यामध्ये त्यांनी अशा शिफारशी केल्या आहेत की, ग्रामीण भागातील महिलांच्या राजकीय जाणिवा प्रगल्भ व्हाव्यात या दृष्टीने ग्रामस्तरावर नेतृत्त्व गुण विकसित करणाऱ्या कार्यशाळा शासनाने आयोजित कराव्यात.

6. <u>पंचायतीराज संस्थातील महिलांचा सहभाग, नांदेड जिल्हा एक अभ्यास</u> **:-**

प्रा. गोविंद यमलवाड यांनी आपल्या संशोधन प्रबंधात ७३ व्या घटनादुरुस्तीनंतर पंचायतीराज संस्थांतील महिलांना मिळालेल्या आरक्षणांची अंमलबजावणी झाली का ? महिला आरक्षणाचा उद्देश कितपत साध्य झाला, तसेच महिला प्रतिनिधी,

पदाधिकाऱ्यामध्ये राजकीय सहभाग वाढला का ? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न केलेला आहे.

7. दत्तात्रय चंद्रकांत वाबळे :-

यांनी स्थानिक स्वराज्य संस्थेमधील महिलांचे योगदान पुणे जिल्हा परिषदेतील महिलांचा सामाजिक व राजकीय सहभाग हा आरक्षणविषयक दृष्टीकोण पाहिला आहे. या खेरीज महिलांची स्थानिक राजकारणातील भूमिका यांचा आढावा घेण्यात आला आहे.

8. डॉ. अशोक सिध्देवाड :-

यांनी “महिलांचा राजकीय सहभाग- नांदेड जिल्ह्याचा विशेष अभ्यास या शोध प्रबंधात यांनी राजकीय सहभाग विषयक वेगवेगळया स्तराचा अभ्यास मांडला आहे.

प्रस्तुत पुर्वसंशोधनाचा आढावा द्वारे संशोधकाने संशोधनाचे काम व प्रश्नाची उकल होण्यासाठी करण्यात येईल.

1.10.1 संशोधन मर्यादा :-

प्रस्तुत संशोधन हे महाराष्ट्रातील केवळ बीड जिल्ह्यातील 5 तालुक्यातील निवडक ग्रामपंचायती क्षेत्रातील महिला पदाधिकाऱ्यापुरते मर्यादित आहे ग्रामपंचायत स्तरावरील केवळ महिला हा संशोधनातील मुळ घटक असून पुरुष वर्गाच्या राजकारण विषयक गोष्टींना मर्यादा आहेत.

1.11संशोधन प्रकरणांची रुपरेषा :-

1. प्रकरण पहिले – प्रस्तावना :

प्रस्तुत प्रकरणामध्ये विषयाची ओळख, विषय निवडण्याचा हेतू , संशोधन पदध्दत, उद्दिष्टे, गृहितके यांचा आढावा घेण्यात येईल.

2. प्रकरण दुसरे :

बीड जिल्ह्याची सविस्तर माहिती या प्रकरणामध्ये जिल्हा निर्मिती, भौगोलिक परिस्थिती,सामाजिक परिस्थिती, राजकीय पार्श्वभूमी, ऊसतोड कामगारांचा जिल्हा म्हणून असलेली ओळख अशा विविध अंगाने बीड जिल्ह्याचा अभ्यास या प्रकरणामध्ये करण्यात येईल.

3. प्रकरण तिसरे : पुर्वसंशोधनाचा आढावा

संशोधन कार्य पुर्ण करण्यासाठी आवश्यक असणारे विविध संदर्भ साहित्य मोठ्या प्रमाणावर अभ्यासण्यात येतील. संशोधनाच्या माहितीसाठी आवश्यक अशा संदर्भ साहित्याचा आढावा घेण्यात येईल.

प्रकरण चौथे

4. पंचायतराज संस्थेचा उदय, विकास व वाटचाल :-

या प्रकरणामध्ये भारतातील तसेच महाराष्ट्र व बीड जिल्ह्यातील पंचायतराज व्यवस्थेचा संशोधनाच्या दृष्टीने सविस्तर आढावा घेण्यात येईल. महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांचा संख्यांत्मक माहितीचा आढावा या प्रकरणामध्ये घेण्यात येईल.

5. प्रकरण पाचवे :-

ग्रामपंचायतीमधील महिला लोकप्रतिनिधीचे राजकीय सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक बाबींचे मुद्देसुद विश्लेषण-

या प्रकारामध्ये निवडक ग्रामपंचायतीमधील महिला लोकप्रतिनिधींची राजकीय पार्श्वभूमी त्यांची सामाजिक परिस्थिती शैक्षणिक पात्रता आर्थिक परिस्थिती या सर्व गोष्टींचा संशोधन पुरक आढावा या प्रकरणामध्ये घेण्यात येईल.

6. <u>प्रकरण सहावे</u> :-

ग्रामपंचायतीमधील महिला लोकप्रतिनिधीचे राजकीय निर्णय प्रक्रियेच्या भूमिकांचे मुल्यमापन –

या प्रकरणामध्ये निवडक ग्रामपंचायतीमधील महिला लोकप्रतिनिधींच्या मुलाखत अनुसूचीद्वारे तसेच निरिक्षणाद्वारे प्राथमिक माहितीची मुल्यमापन करण्यात येणार आहे. या महिला लोकप्रतिनिधी राजकीय निर्णय प्रक्रियेत सहभागी होण्यापूर्वीची त्यांची पार्श्वभूमी त्यांच्या राजकीय जाणीवांचा अभ्यास महिला नेतृत्वाचा विकास व त्यांचे सक्षमीकरण या सर्व बाबींचा या प्रकरणामध्ये संशोधनपुरक आढावा घेण्यात येईल.

7. <u>प्रकरण सातवे</u> :-

या प्रकरणामध्ये संशोधनातून निघालेले निष्कर्ष मांडण्यात येतील. तसेच संशोधकांनी कोणत्या शिफारशी येतील याची सविस्तर मांडणी करण्यात येईल.

1.12 संदर्भसूची –

1. डॉ. पळशीकर सुहास व डॉ.बिरमल नितीन (संपा.) महाराष्ट्राचे राजकारण 2009 प्रतिमा प्रकाशन, पुणे पृ. 11
2. डॉ. शांतराम भोगले : भारतातील स्थानिक शासन विद्या प्रकाशन नागपूर
3. पाटील व्ही. बी. (2005) : महाराष्ट्रातील पंचायतराज व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था- के सागर पुणे.
4. व्होरा राजेंद्र, पळशीकर सुहास (1985) राज्यशास्त्र कोश, दास्ताने रामचंद्र आणि कंपनी
5. रोहिनी गव्हाणकर (1986) : मराठा स्त्रीशक्तीचे राजकारणी रुप, पुणे.

6. डॉ. पवार दीपक महिलांचे राजकीय सक्षमीकरण 2013, श्री साईनाथ प्रकाशन नागपूर
7. आगलावे प्रदिप सामाजिक संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे, जानेवारी 2010, साईनाथ प्रकाशन नागपूर
8. चोरमारे विजय, स्त्रीसत्तेची पहाट, 2008 एक्सप्रेस पब्लिशिंग हाऊस, कोल्हापूर
9. डॉ. पवार वैशाली, महिलांच्या सत्तासंघर्षाचा आलेख 2012, डामंड प्रकाशन, पुणे.
10. डॉ. देशमुख अलका, विविधांनी आयामामातून स्त्री, 2011, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.

संशोधक विध्यार्थी — संशोधक मार्गदर्शक

युवराज महाडीक — डॉ. रजनी बोरोळे